# प्रयोगशील शिक्षण व शिक्षकांचा आनंद

आज शिक्षणाच्या संदर्भात, आणि त्यातही विशेषतः प्राथमिक शिक्षणाच्या संदर्भात, अत्यंत गंभीर परिस्थिती निर्माण झाली आहे, आणि ती, आज आपल्या वर्गांमधून बसणाऱ्या लहानग्या मुला -मुलींच्या भावी आयुष्याच्या दृष्टीने अत्यंत घातक ठरणारी आहे. निसर्गतः जे वय भरभरून, वेगाने शिकण्याचे आहे, त्याच वयात मनोबल, ज्ञान आणि कौशल्य यांच्या बाबतीत शाळांत जाऊनही त्यांच्या हाती फारसे काही लागत नाही. त्यांच्या ज्ञानमय आयुष्याचा पायाच नीटपणे घातला जात नाही, आणि आपण तर त्यांना एकविसाव्या शतकाच्या वैश्विक स्वरूपाच्या ज्ञानमय युगात नेण्याची भाषा करतो आहोत.

आज लाखो मुले शाळांमधून जात आहेत. वास्तविक शाळेत न जाणाऱ्या मुलांचाही -त्यांच्या शिक्षणाचाही- मोठा गंभीर प्रश्न आहेच; पण त्याविषयी मी आता बोलत नाही. पण मला संशय मात्र असा आहे की, शालेय जीवनात शिकू पाहणाऱ्या मुलांपेक्षा या शालाबाह्य, पण जीवनाच्या शाळेत शिकू पाहणारी मुले अधिक चांगली शिकत असावीत; कारण ती शाळेपासून वंचित असतील पण ती जीवनापासून वंचित नाहीत. जीवनातूनच ती शिकताहेत आणि जीवनासाठीची आपली तयारी, निसर्गाने बहाल केलेल्या क्षमतांच्या सहाय्याने आपली आपणच करत आहेत. त्यामुळे मी या मुलांविषयी आता बोलणार नाही.

आज इथे भाषण करत असताना माझ्या असताना माझ्या डोळ्यासमोर शाळेत जाणारी, शिकण्यासाठी जीव पाखडणारी, धडपडणारी मुले आहेत आणि त्यांना शिकण्यासाठी जीवापाड मेहनत करणारी शिक्षक मंडळी आहेत. आजचे शालेय शिक्षण समाधानकारकपणे चालले आहे असे आपल्यापैकी कुणीच म्हणत नाही. तसे म्हणणे हे आत्मवंचना केल्यासारखे होईल. पण ते समाधानकारक असावे, गुणवत्तापूर्व असावे आणि याचे श्रेय शिक्षक म्हणून आपल्या पदरी पडावे, असे आपल्यापैकी प्रत्येक जण म्हणेल, याची मला खात्री आहे. याचबरोबर, शिक्षण असे विद्यार्थ्यांना नि शिक्षकाला पूर्ण समाधान देणारे, यश देणारे असू शकते, निश्चितपणे असू शकते, हे विविध प्रयोगांनी सिद्ध झालेले आहे. हे खात्रीशीररीत्या आणि अत्यंत ठामपणे मांडण्यासाठी आज मी आपल्यापुढे उभा आहे.

आजचे आपल्या शाळांमधील शिक्षण समाधानकारक नसण्याची कारणे आपण समजावून घेतली, ती दूर करण्यात शिक्षक म्हणून पुढाकार घेतला आणि मुख्य म्हणजे शिक्षक सुधारण्याची क्षमता केवळ आपल्यातच आहे, शिक्षकांमध्येच आहे हे लक्षात घेतले तर, यावर विश्वास ठेवलात तर केवळ वर्षभरातच आपण शिक्षणात आमूलाग्र परिवर्तन करू शकू. शिक्षणात बदल करण्याचे सामर्थ्य शासनात नाही; शिक्षकांत आहे, हे सत्य आपण जाणून घ्या. शिक्षणात क्रांती शिक्षकच करू शकतो, कारण ती, त्याची युद्धभूमी आहे. आपल्या नित्याच्या वर्गभूमीवर ठामपणे उभा असतो तो शिक्षकच. शासन फार तर शाळेपर्यंत पोचू शकेल, वर्गात क्वचित डोकावू शकेल, पण शासनाचे सारे कार्य वर्गाच्या उंबरठ्याबाहेर आहे. शिक्षक हाच वर्गाचा अनभिषिक्त राजा असतो. त्याने फक्त दयाळू राजासारखे वागायचे असते आणि प्रजेच्या मनात आपल्या क्षमतेबद्दल विश्वास जागवायचा असतो.

आजचे शालेय शिक्षण आम्हांला व्यक्तिशः आणि सार्वत्रिकरित्या यश देत नाही. माझ्या मते याची तीन कारणे आहेत. पहिले कारण म्हणजे, शासन जरुरीपेक्षा जास्त, शालेय शिक्षणात हस्तक्षेप करत आहे. शिक्षकांची शासन नेमणूक करत आहे हे ठीक आहे; किंबहुना सरकारचे ते कर्तव्यच आहे. सरकारने शालेय व्यवस्था सुखरूप चालावी यासाठी काही नियमावली करणे हेही ठीक आहे. पण बस एवढेच.

यापुढे सरकारने शिक्षणात शिरण्याचा अवाजवी प्रयत्न करू नये असे वाटते. आज बी. एड्. डी. एड्. च्या कालबाह्य कार्यक्रमांची सक्ती करणे, क्रमिक पुस्तकांची मक्तेदारी राखणे, शिक्षकांचे प्रशिक्षण करणे किंवा मोठ्या संख्येने परीक्षांचा आग्रह धरणे हा सरकारचा निरर्थक हस्तक्षेप आहे आणि शिक्षकांनी नि त्यांच्या संघटनांनीच याविरूद्ध आवाज उठवला पाहिजे. शिक्षणक्षेत्र स्वच्छ ठेवण्याचा आणि विद्यार्थी नि शिक्षक यांचे स्वातंत्र्य टिकविण्याचा हाच एक मार्ग आहे.

आजचे शिक्षण असमाधानकारक असण्याचे दुसरे कारण आहे, ते म्हणजे, अत्यंत कालबाह्य असा शिकण्या -शिकविण्याविषयीचा दृष्टिकोन, त्यासाठीच्या पद्धती आणि साधने यांचा वापर आपण अजूनही करत आहोत. विसाव्या शतकाच्या सुरुवातीच्या काळात झालेल्या प्राण्यांवरील संशोधनावर आधारित अशा मानसशास्त्रावर आधारलेल्या शिक्षणशास्त्राला आपण अजूनही धरून ठेवले आहे. गेल्या शतकभरात मानसशास्त्र बरेच पुढे गेले आहे. जुन्या वर्तनवादी विचारसरणीच्या जागी नवी रचनावादी विचारसरणी सारे जग स्वीकारत आहे. आपण मात्र, इतर जगाच्या शतकभर मागेच राहण्याचा केला आहे.

शिक्षणशास्त्र विसाव्या शतकाच्या सुरुवातीचे आणि आपल्या वर्गातील मुलांच्या गरजा मात्र एकविसाव्या शतकातील मध्याच्या! त्यामुळे आजचे शिक्षण आणि उद्याचे जीवन यांचा मेळच घातला जात नाही.

शिक्षण शिकणाऱ्यांच्या गरजांना पुरे पडू शकत नाही. आपण ठरवले तर या पेचातून सहज बाहेर पडू शकू; मार्ग फारसा कठीण नाही. शिक्षकांनीच आता आपापल्या वर्गातील शिक्षणपद्धती बदलायचा निर्णय केला पाहिजे. जुने नेमके काय टाकून द्यायचे आणि त्याच्या जागी नवे काय घ्यायचे हे ठरविले पाहिजे. याचे कितीतरी संचित देशामधील आणि अगदी महाराष्ट्रातील प्रयोगशील शाळांनी आपल्याला देऊन ठेवले आहे.

भाषाशिक्षणाची सुरुवात कुठून, कशी करावी; इतिहास- भूगोल - विज्ञान आणि अगदी गणितसुद्धा मुलांच्या आवडीचे विषय कसे ठरू शकतात; मुलांना अभ्यास कसा आवडू लागतो; त्यांना शाळा कशी आवड लागते; मुलांना शिक्षा करण्याची वेळच कशी येत नाही; शिस्तीचे फारसे प्रश्नही कसे उद्भवत नाहीत; आणि सर्वच मुले भराभर कशी पुढे जातात हे या प्रयोगशील शाळांतच घडून येते असे नाही, तर ते सर्वच शाळांतून सहजपणे घडू शकते. वर्गात काही मुले हुशार असतात नि काही ढ असतात, ही समजूतही चुकीची ठरते. वर्गातील सर्वच मुले हुशार असतात, हे नवे सत्य आता तुम्हांला दिसू शकते, अगदी तुमच्याच वर्गात, थोडक्या काळात तुम्ही ते अनुभवू शकाल. तुम्ही फक्त एक करायचे. आपल्या वर्गातील शिक्षणपद्धती आपली आपणच बदलायचा निर्णय घ्यायचा, आणि डोळे उघडे ठेवून प्रयोगशील शाळांच्या पद्धती न्याहाळायच्या; आत्मसात करायच्या. आपापल्या वर्गातून आणायच्या. मुलांवर विश्वास टाकायचा; आणि मुख्य म्हणजे सारखे मुलांना शिकविण्याचा अट्टाहास न करता मुलांना आपले आपण शिकण्याच्या संधी द्यायच्या. असे सारे केल्याने काय होते?

वर्गातील शिक्षण सुधारते, मुले चांगली शिकतात. मुले मोठी होतात आणि श्रेय आपल्याला देतात. मुख्य म्हणजे आपले विद्यार्थी आयुष्यभर आपल्याला लक्षात ठेवतात.

महाराष्ट्रातील बारा प्रयोगशील शाळांच्या कार्यावर 'शिक्षण : आनंदक्षण' या नावाचे पुस्तक काही वर्षांपूर्वी युनिसेफने प्रसिद्ध केलेले आहे. यात या शाळांनी, शिक्षणात केलेल्या प्रयोगांची नि नव्याने वापरलेल्या पद्धतींची सविस्तर माहिती दिलेली आहे. युनिसेफने ते पुस्तक शिक्षकांसाठीच प्रसिद्ध केले आहे. हेतू असा की, शिक्षकांनी ते नीट वाचावे आणि त्यातील ज्या ज्या गोष्टी आपल्याला आपल्या वर्गात उपयोगी वाटतील त्या घ्याव्यात आणि आपला वर्गही प्रयोगशील बनवावा. मित्रहो, असे करण्यात सरकार कुठेही आड येत नाही. सरकारला प्राथमिक शिक्षण सुधारायचे आहे. शिक्षक जो फक्त क्रमिक पुस्तकांवर भर देतात, तोही दूर करायचा आहे. आपणच पुढाकार घेऊन या बाबतीत सरकारला मदत करू शकतो.

तुम्ही कोल्हापूरचे 'सृजन आनंद विद्यालय' बघा. शाळेबाहेरच्या प्रत्यक्ष जीवनाचे अनुभव शाळेतील शिक्षणाशी कसे जोडता येतात, ते तुम्हांला कळून येईल. तुम्ही फलटणच्या 'कमला निंबकर बालभवन' ला भेट द्या. शाळेतील मुलांचे विश्व बाहेरच्या निसर्गाशी, समाजाशी कशात-हेने जोडले जाते त्याचा अनुभव द्या. तुम्ही पुण्याच्या 'अक्षरनंदन'शी सलगी साधा. मुलांना भाषेचे विविधांगी अनुभव कसे देता येतात, भाषासमृद्ध कशी करता येते, याची तंत्रे शिकून घ्या. तुम्ही डहाणू तालुक्यातील ऐना या आदिवासी गावातील ‘ग्राममंगल’ या संस्थेत जाऊन या. साधनांनी मुले स्वतःच भाषा, गणित आणि अन्य विषय कसे वेगाने आत्मसात करत जातात. ते पाहा आपल्या सारख्याच हजारो सरकारी शाळांसाठी या 'प्रयोगशाळा' आहेत. जोवर आपली स्वतःची शाळा अशी 'प्रयोगशाळा' होत नाही तोवर या शाळांचा उपयोग आपण करून घ्यायला हवा. त्यांच्या शिक्षणपद्धती, त्यांची तंत्रे, त्यांनी निर्माण केलेले वाङ्मय, त्यांच्या मुलांशी वागण्याच्या, मुलांना प्रेरित करण्याच्या पद्धती या साऱ्या बाबी आपण सहजपणे उपयोगात आणू शकतो आणि आपल्या शाळांची गुणवत्ता थोड्याच अवधीत वाढवू शकता . हे सारे आपण स्वतः किंवा आपल्या शिक्षक मित्रमैत्रिणींचा छोटासा गट किंवा आपली संपूर्ण संघटना पुढाकार घेऊन करू शकतो. अशाप्रकारे, आपल्या शाळेची गुणवत्ता वाढवण्यासाठी आपल्याला सरकारच्या परवानगीची गरज नाही.

काही मोजकी उदाहरणे घेऊन, प्रयोगशील शाळांनी आपल्या शाळेची नि विद्यार्थ्यांची गुणवत्ता कशी वाढवली ते पाहू. कोल्हापूरच्या सृजन आनंद विद्यालयातील रोहिणी संत या चौथीच्या वर्गाला शिकवत होत्या. शाळेला जाताना, वाटेत एके ठिकाणी घोड्याला नाल ठोकण्याचा आटापिटा काही मंडळी करत होती. बाईंनी फक्त चौकशी केली की, 'हे काम अजून किती वेळ चालेल?' चारी पायांना नाल ठोकायला भरपूर वेळ लागणार होता. बाई शाळेत गेल्या आणि चौथीचा वर्गच इथे घेऊन आल्या. तास, दीड तास मुलांनी उत्सुकतेने काम पाहिले, जमेल तिथे हातभारही लावला. कितीतरी प्रश्न विचारले. उत्तरे मिळवली. यातून दोन्ही गोष्टी घडल्या. मुलांनी वेगळाच अनुभव घेतला, त्यातून ती नवेच काहीतरी शिकली आणि शिवाय या घटनेत समरस होण्याचा, शिकण्याचा आनंद त्यांनी घेतला. पण, ही गोष्ट इथे थांबली नाही. मुले शाळेत परतली. बाईंनी वर्गातच विषय पुढे चालू ठेवला. त्यावर आणखीन गप्पा झाल्या. मुलांनी आपापला अनुभव लिहून काढला, पुढे

वर्गात त्याचे वाचन झाले. 'घोड्याच्या  पायांना नाल ठोकणे'  यावरून बाई प्राणीशास्त्रातही शिरल्या. मुलांच्या अनुभवाच्या कक्षा याही अंगाने विस्तारल्या. जिवंत अनुभवांतून भाषाशिक्षण नि शास्त्रशिक्षण कसे होऊ शकते याचा हा एक नमुना.

फलटणच्या 'कमला निमकर बालभवन'च्या प्राचार्या डॉ. मंजिरी निंबकर यांनी भूगोलाचा अभ्यास शाळेबाहेर नेला. मुलांची सहल जवळच्या वारूगडावर नेली होती. मुले डोंगर चढून गेली; पण नुसतीच नाही. तर तिथल्या दगड -मातीचा अभ्यास करत करत डोंगरावर चढली. मुलांनी वेगवेगळया थरातील जांभा, बसाल्ट, मांजण्या खडक लालमाती यांचा शोध घेतला. सात कोटी वर्षांपूर्वीच्या या निद्रिस्त ज्वालामुखीमधील दगड - मातीचे नमुने समजावून घेत भूप्रस्तरशास्त्राचा अभ्यास त्यांनी केला. असे अनेक प्रकल्प झाले आणि आता शाळेत कायमस्वरूपी 'नेचर क्लब' उभा राहिला आहे.

पण हाही अभ्यास इथे संपत नाही. परिसरात हिंडून निरीक्षण करणे, हा मुलांचा नित्याचा उद्योग झाला आहे. अनंत वस्तू जमवायच्या आणि त्यांच्याबद्दची माहिती पुस्तकांतून गोळा करायची. मराठीतह आता काही, 'आपली सृष्टी आपले धन' 'सृष्टीविज्ञानगाथा', 'यांनी घडविले सहस्त्रक' अशी कितीतरी चांगली पुस्तके आली आहेत. अशा पुस्तकांमधून आपल्याला हव्या असलेल्या माहितीचा शोध घेण्यात खूप रमतात, खूप शिकतात. मुख्य म्हणजे स्वतःचे स्वतः शिकतात.

मुलांना कल्पना लढवायला खूप आवडतात. आपण मात्र त्यांना क्रमिक पुस्तकांच्या धड्यांमधील प्रश्नोत्तरांमध्ये अडकवून ठेवतो. क्रमिक पुस्तक हे शिकण्याचे केवळ एक साधन आहे, शिक्षकांनी इतरही साधनांचा वापर करावा, असे सरकारही सांगत असते.

मुलांचे भाषाशिक्षण अगदी सहजगत्या बालपणापासूनच होतच असते. मुले परिसरातून भाषा शिकतात. शाळेत येण्यापूर्वी त्यांनी बोलीभाषा उत्तमच आत्मसात केलेली असते. ती त्यांना कोणी शिकवत नसते. कोणीही 'शिकलेली' नसते. भाषा ही न शिकवून येणारी गोष्ट आहे. तरीही शाळेत भाषा हा एक प्रमुख विषय असतो. येथे भाषा समृद्ध होण्याची काही कौशल्ये आपण मुलांना देत असतो. वाचणे आणि लिहिणे ही अशी दोन कौशल्ये आहेत. भाषाशिक्षणाचा औपचारिक भाग म्हणजे वाचायला नि लिहायला शिकणे ; ती शिकताना 'प्रमाण' भाषा शिकून घेणे आणि मग या सर्व साधनांनिशी, भाषेकरवी नवनवे विविध प्रकारचे ज्ञान मिळविण्याचे मार्ग स्वतःसाठी मोकळे करणे.

भाषेच्या औपचारिक शिक्षणाची सुरुवात अक्षर ओळख देऊन, बाराखडी शिकवून करायची नसते; ते एक इतके कंटाळवाणे काम आहे, की मुले भाषाशिक्षणापासून, एकूण शिक्षणापासूनच दूर जाण्याची शक्यता असते. असे घडतानाही आपण पाहतो. म्हणून प्रयोगशील शाळा आपल्या प्रयोगांमधून असे सिद्ध करून दाखवतात की, भाषाशिक्षणाची सुरुवात ही मुलांच्या दैनंदिन जीवनातील शब्दांपासून करावी. कारण हे शब्द त्यांच्या ओळखीचे असतात; अक्षरे अर्थशून्य असतात; शब्द अर्थपूर्ण असतात. म्हणून अशा अर्थपूर्ण शब्दांपासूनच थेट औपचारिक वाचन -लेखनाची सुरुवात करावी. या पद्धतीने मुले भराभर लिहा - वाचायला शिकतात.

भाषा ही मुक्तपणे शिकण्याची गोष्ट आहे. ती क्रमिक पुस्तकांत बंद करून शिकता येत नाही. ङ्केभाषेच्या अनुभवांच्या आकाशात मुलांना मुक्तपणे विहरू द्यावे. मुले आपली आपणच शिकतात विविध गमतीजमती करत भाषेचे विविध कंगोरे जाणून घेतात. भाषा शिकणे हे त्यांना आनंददायक वाटते.

ग्राममंगल संस्थेने पहिली - दुसरीच्या मुलांसाठी तथाकथीत क्रमिक पुस्तकांत दिलेल्या सर्व क्षमता अर्थपूर्ण शब्दांद्वारे शिकण्याकरिता 'लिहू या वाचू या' ही नऊ पुस्तकांची मालिका तयार केली आहे. त्याचे प्रयोग अगदी थेट चंद्रपूर - यवतमाळ ते मुंबई पुण्यापर्यंत केले आहेत. सर्वच ठिकाणचा अनुभव असा आहे की, कोणत्याही परिस्थितीतून आलेले सहा वर्षांचे मूल एका महिन्यात लिहा-वाचायला शिकते. वर्षभरात आपापली कल्पनाशक्ती लढवून उत्तम निबंध लिहितात. उत्तम त-हेने आपल्या कल्पना विचारांची अभिव्यक्ती करतात.

पुण्याच्या 'अक्षरनंदन' शाळेत, पहिलीपासूनच मुलांना स्वतःच्या कल्पना लढवायला नि विचार करायला उद्युक्त करतात. 'दगड उडायला लागले तर' किंवा 'माणसाला शेपूट असती तर' असे गमतीदार विषय दिले की, मुलांच्या कल्पनांचे पतंग उडायला लागतात. अशा गोष्टींमुळे मुलांना भाषा शिकण्याची गोडी लागते. आणखी एक गोष्ट लक्षात ठेवायला हवी. भाषा ही संपूर्ण वर्गाला शिकविण्याची बाब नाही, तर ती प्रत्येक मुला - मुलीला आपल्या क्षमतेनुसार शिकू देण्याची गोष्ट आहे. खरे तर सर्वच शिक्षणाबाबत ही गोष्ट खरी आहे. आपण मुलांना 'शिकविण्याचा अट्टाहास करू नये, मुलांना शिकू द्यावे. अशा शिकण्यासाठी भरपूर संधी मात्र मुलांना उपलब्ध करून देणे, हेच शिक्षकाचे खरे काम आहे, "शिकवणे' हे नव्हे ! शिकण्याची संधी देते ती शाळा, अशी शाळेची व्याख्या मी करतो. साहजिकच या नव्या दृष्टिकोणातून आजवरच्या समजुतीनुसार शिकवतो तो शिक्षक नव्हे, तर विद्यार्थ्यांना शिकण्याच्या संधी उपलब्ध करून देतो तोच शिक्षक होय.

ग्राममंगल संस्थेने अशाप्रकारे मुलांनी आपले आपण शिकावे, यासाठी शेकडो शैक्षणिक साधनांची निर्मिती आणि संकलन केले आहे. केवळ भाषाच नव्हे, तर अगदी इतिहास- भूगोल - विज्ञान आणि एरवी कठीण म्हणून गणलेले गणितही मुले या साधनांकरवी नीट समजुतीने, आपापल्या वेगाने आत्मसात करतात. शिक्षकांनी आता वर्गांमधून या साधनांद्वारे मुलांना शिकू देण्याचा घाट घालावा; आपले शिकविण्याचे कामच कमी करावे.

ग्राममंगल संस्थेने भाषा आणि गणित या नव्या पद्धतीने शिकवून पाच वेगवेगळ्या शाळांमधून प्रयोग केला. निष्कर्ष धक्कादायक आहेत. या सर्वच शाळांमधील सर्वच मुले, अपेक्षित असे सर्वच आणि तेही नीट आकलन करून शिकून घेतात. परीक्षांमधील गुणांच्या कालबाह्य भाषेत सांगायचे तर, सर्वच मुले सर्वच विषयांच्या सर्वच परीक्षांमध्ये अगदी शंभर टक्क्यांच्या जवळपास पोचू शकतात. यालाच गुणवत्तापूर्ण शिक्षण आपण नाही का म्हणणार ?

शाळा मधील विद्यार्थी स्वप्रयत्नाने उत्तम संधी मिळाल्यास चांगले शिकू शकतात आणि अशा शिक्षणात आनंदही घेतात. शाळा त्यांना आवडू लागते. असे प्रयोगशील शाळांच्या आजवरच्या कार्यांमधून आढळून आले आहे. आता आपण सर्वांनी या शाळांचा मागोवा घेत घेत आपापल्या शाळा गुणवत्तापूर्ण करण्याचा ध्यास घ्यायचा आहे. हे नवशिक्षण सार्वत्रिक करायचे आहे.शाळांमधून चालणारे प्राथमिक शिक्षण समाधानकारक नाही, याचे आणखी एक कारण आहे, आणि ते तर मला सर्वांत महत्त्वाचे वाटते आहे. हे कारण म्हणजे, शाळांमधील, वर्गांमधील काम भयंकर कंटाळवाणे झाले आहे आणि शिकवणे शिक्षकांना कंटाळवाणे वाटते आहे. किंबहुना ते शिक्षकांना कंटाळवाणे वाटते आहे, म्हणूनच विद्यार्थ्यांना कंटाळवाणे वाटते आहे. एकप्रकारची उदासीनतेची छायाच जणू साऱ्या शिक्षणावर पडली आहे. रोज तेच करावे लागणे आणि वर्षानुवर्षे तेच तेच करत राह खरोखरच कंटाळवाणे आहे. मुळात आपण ज्या पद्धतींनी शिकवतो त्याच मुळी कंटाळवाण्या आहेत.

त्याच्यासाठी घेतली जाणारी शासकीय प्रशिक्षणेही तेवढीच कंटाळवाणी असतात, हा तर तुम्हा सर्वांचाच अनुभव आहे. सततच्या परीक्षा घेणे, त्यासाठी मुलांकडून प्रश्नोत्तरे पाठ करून न घेणे आणि परीक्षांच्या हे पेपरांचे गठ्ठे तपासत राहणे, यांपेक्षा जास्त कंटाळवाणी गोष्ट दुसरी कोणतीही नसेल. बहुसंख्य शाळांचे वातावरण, तिथल्या इमारती, परिसर, भिंतींचा रंग, शाळांतील बाके -कपाटे - खुर्च्या - टेबले, फळे आणि मुख्य म्हणजे भिंतींवर बळजबरीने लिहिलेले तथाकथित 'सुविचार' या साऱ्याच गोष्टी भयानक उदासीनता निर्माण करणाऱ्या असतात.

मित्रहो, सरकार तुम्हांला या कंटाळवणाणेपणातून बाहेर काढू शकणार नाही. हे काम आपले आपणच करायचे आहे. कुणा दुसऱ्यासाठी करायचे नाही, तर अगदी आपल्या स्वतःसाठी करायचे आहे ज्या ठिकाणी आपण दिवसातील पाच - सहा तास, नित्य नियमाने रोजच्या रोज आणि असेच आयुष्यभर घालवणार आहोत, आहोत तर हा वेळ छान वातावरणात गेला पाहिजे ; इथे असण्याचा आपल्याला आनंद वाटला पाहिजे. आज उलट अशी परिस्थिती निर्माण झाली आहे की, आपल्यालाही शाळेत जावेसे वाटत नाही आणि विद्यार्थ्यांना तर नाहीच नाही.

हे सारे उदासीन, कंटाळवाणे वातावरण बदलून टाकणे, आपल्याला शक्य आहे. खरे तर एकाच वाक्यात सांगायचे तर आपण आनंदी राहायचा प्रयत्न करू या. शाळेत आनंदी वातावरण निर्माण करून हे करता येईल.

शाळेतील आनंद निर्मितीच्या तीन पायऱ्या आहेत. पहिली पायरीच खूप महत्त्वाची आहे. ती आपल्या स्वतःशी संबंधित आहे. प्रथमतः आपले शैक्षणिक जीवन आनंदी घालवण्याचा निर्णय आपण घेऊ या. आपल्याला आपले स्वतःचे आयुष्य सहजपणे वळवता येऊ शकते, हा आत्मविश्वास जवळ बाळगू या. या दिशेने जाण्यासाठी सरकारची परवानगी वगैरे लागत नाही. सरकारला विचारायचेही कारण नाही. कारण, ही आपल्या व्यक्तिगत स्वातंत्र्याशी संबंधित गोष्ट आहे. आपण शिक्षक म्हणून कसे असावे हे ठरविण्याचे अधिकार आपले आहेत. थोडक्यात असे की, शालेय वातावरण आनंदी बनविण्याच्या आपली मानसिकता आपली आपण घडविणे हीच पहिली पायरी आहे.

एकदा आपल्या मनाची अशी तयारी झाली की, शाळेच्या वातावरणातील सुंदर गोष्टी कोणत्या आहेत आणि कुरूप बाबी कोणत्या आहेत, हे आपल्या लक्षात येऊ लागेल. विद्यार्थ्यांना भीती कशाची वाटते, कंटाळा कशाचा येतो या गोष्टीही लक्षात येऊ शकतील. प्रचंड उत्साह आणि इच्छाशक्ती आलेल्या मुलांची फौज आपल्या हाताशी आहे; आणि त्यांचे हात नवीन कामांसाठी आसुसलेले आहेत, हे लक्षात घेतले की शाळा, परिसर सुंदर करण्याचे काम त्यांच्या मदतीने आपण करू शकतो.

काम आपले मदत त्यांची ! या पद्धतीने केलेल्या कामात एका नव्या मूल्याचा शोध तुम्हांला लागेल. हे मूल्य म्हणजे श्रमानंद ! श्रमात आनंद वाटायला लागणे हाच जीवनानंदाचा मुख्य मार्ग आहे. मुलांना निसर्गतःच श्रमानंदाची ओढ असते, याचाही प्रत्यय येईल आणि हाच श्रमानंद ही त्यांच्या बौद्धिक प्रगतीसाठी अत्यावश्यक अट आहे.

तिसरी पायरी आहे ती, आपल्या वर्गामधील शिक्षणपद्धतीत आमूलाग्र बदल करण्याची. यासाठीच्या पद्धती तर आपल्या हाताशी आहेत. प्रयोगशील शाळा त्या आपल्याला मुक्तपणे देऊ शकतात; आपण त्या घेऊया. त्यासाठी लागणारे थोडेसे प्रशिक्षण हा आपण आपल्यासाठी करण्याचा कार्यक्रम आहे. त्यासाठी सरकारवर अवलंबून राहण्याची गरज नाही, राहूही नये. वर्गातून आनंददायी शिक्षणपद्धती वापरून विद्यार्थी आणि शिक्षक दोन्हीही आनंदी होतात. शिक्षकांपुढचे ते जबरदस्त आव्हान असते. शिक्षक संघटनांनी आता शिक्षण गुणवत्तेचा कार्यक्रम स्वतःच्या हाती घ्यायला हवा आहे. आपल्या एकूणच शैक्षणिक - सामाजिक क्षेत्रात ही नवी दिशा घेऊन आपण पुढे जायला हवे आहे. माझे म्हणणे पुन्हा एकदा लक्षात घ्या. आजच्या शिक्षणात मूलभूत परिवर्तन करण्याची, गुणवत्ता क्रांती करण्याची शक्ती फक्त शिक्षकांमध्येच आहे.

आपण ही जबाबदारी घेऊया. आपले शैक्षणिक जीवनच आनंदी बनवू या, आपल्यासाठी आणि आपल्या विद्यार्थ्यांसाठी !

❖